# प्रकरण पहिले

# प्र स्ता व ना

## प्रकरण पहिले

## प्र स्ता व ना

### स्त्री आणि राजकारण :

महाराष्ट्र राज्याच्या सन १९९० च्या शासनाच्या कायद्याच्या अनुषंगाने, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारामध्ये महिलांसाठी ३० टक्के राखीव जागा केलेल्या आहेत. त्यानुसार "मुरगूड नगरपालिकेत नगरसेविकांचा सहभाग" या संदर्भाबरोबरच स्त्रीयांचा राजकीय सहभाग या विषयीच्या अभ्यासाचा हा एक प्रयत्न आहे. मुलत: "राजकारण" आणि "राजकीय सहभाग" यांचा नेमका अर्थ काय ? याचे प्रथम स्पष्टीकरणे होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर वैदिक काळापासून स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत राजकीय हक्क म्हणून भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा कोणता होता हे समजून घेणे गरजेचे आहे.

राजकारण हे विस्तृतपणे दोन पध्दतीनी मांडता येते. त्यातील एक म्हणजे एखादी व्यक्ती कार्यालयांना नियंत्रणामध्ये ठेवण्याचा इच्छेने प्रयत्न करत असते व दुसरे म्हणजे एखाद्या वादाच्या किंवा चर्चेच्या विषयाबद्दल नागरी समाजाशी संबंधित राहून प्रश्न सोडवणूकीसाठी प्रयत्न करणे होय. परंतु राजकारण हे व्यावसायिक दृष्टिकोनातून सहभागी होण्यासाठी नाही तर ते देशाला आदर्शवत बनवून पुढे घेऊन जाणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी आहे. नागरिजीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीने, (त्याने किंवा तिने) आपल्या निश्चित अशा फायद्याशिवाय भाग घेवू नये अथवा फायद्यासाठी भाग घ्यावा असा संस्कृतीचा नमुना आहे. समाजीकरण हे

हे अर्थातच आपला राजकीय सहभागामध्ये संबंधित असल्याने राजकीय समाजीकरण महत्त्वाचे आहे. लहान मुलाला की जे प्रौढांच्यात वाढते, त्यांच्याबरोबर बोलते आणि स्वत:च्या सार्वजनिक घटनावरील निर्णया-साठी कृती करत असते, त्या लहान मुलाला राजकीय सहभागाची जाणीव अगदी सहजपणे होते. हे अनेक राजकीय सहभागावरील अभ्यासकांनी दर्शविलेले आहे.

प्रौढांच्या बाबतीमध्ये त्यांच्या समुह संबंधामधून, शैक्षणिक संस्थां-मधून तसेच त्यांच्या आत्मविश्वासाबद्दलच्या जाणीव करून देणाऱ्या कृती ज्या त्यांच्या सभोवताली घडत असतात अशा समाजातील अनेक संस्थामधून सामाजिकरणाची सुरुवात होते. यामुळे त्या व्यक्तीला सार्वजनिक कार्या-मध्ये स्वत:ला सहजपणे सहभागी होण्याची व स्वत:चा विकास करून घेण्याची संधी मिळत असते.

"अल्मंड" आणि "व्हेब" या विचारवंतानी दर्शविल्याप्रमाणे "राजकारण" म्हणजे शक्ति आत्मसात करणे किंवा राजकीय घडामोडी-मध्ये सहभागी होऊन एखाद्या ठरावाला निश्चित करण्याचे माध्यम होय." या राजकीय सहभागाचे तीन नमुन्यामध्ये विस्तृतपणे विश्लेषण केले आहे.

१) "संशोधक" सहभाग
२) संघटनात्मक सहभाग
३) प्रातिनिधीक सहभाग

संशोधक सहभाग म्हणजे, राजकीय कार्यकर्त्यांनी स्वत:ला समस्या सोडवण्यामध्ये गुंतवून घेऊन शासकीय तंत्राचा वापर लोकांच्या भल्यासाठी करणे असा याचा अर्थ होतो.

प्रातिनिधीक सहभाग म्हणजे संशोधकासारखे स्वत:चे प्रतिनिधीत्व न करता ज्या विभागाचे तो प्रतिनिधीत्व करतो त्या विभागातील समस्या सोडवणे होय.

संघटनात्मक सहभाग म्हणजे एखादा राजकीय कार्यकर्ता एखादी राजकीय बाब प्रभावीपणे न मांडता, समाजामध्ये एखाद्या गोष्टीचे संघटनात्मक आणि क्रियाशील मोहिमेसारखे विश्लेषण करतो. "किर्कपॅट्रिक" यांनी बळकट प्रेरणात्मक राजकीय कृती दर्शविलेली आहे. त्यांच्या मनानुसार सार्वजनिक घटना प्रभावीपणे मांडण्याची इच्छा, प्रभावाचा अभ्यास, व तो राजकीय प्रभाव मांडण्याची इच्छा यासाठी कौशाल्याची गरज असते. "लॉसवेल" यांनी दर्शविल्याप्रमाणे वरील बाबी लोकशाही व्यक्तिमत्वाशी अगदी जवळच्या संबंधित आहेत.

राजकारण आणि राजकीय सहभाग या अनेक मार्गाने समजू शकतात त्यामुळे त्या संदिग्ध किंवा अनिश्चित स्वरूपाच्या नाहीत. मिलबर्थ, कॅम्पबेल, व्हर्बा, ने आणि मिलर, स्टोक्स यांच्या मतानुसार राजकीय सहभाग म्हणजे गटाची कृती, मतदान, सार्वजनिक कार्यालयाशी लेखन इत्यादी गोष्टी की, ज्या राजकीय शक्ती वाढविण्यापेक्षा राजकीय कृतींशी संबंधित आहेत. आणि म्हणून राजकीय सहभाग याचा आपण दोन दृष्टीने विचार करू. एक म्हणजे शासकीय अस्तित्व आणि राजकीय गट. यावरती नियंत्रण राखणाऱ्या राजकीय कृतींशी राजकीय सहभाग संबंधित आहे. दुसरे म्हणजे शासकीय अस्तित्व यावरती प्रभाव न टाकता राजकीय सहभागाचा इतर सर्व विभागांमध्ये समावेश होतो. अशाप्रकारे आपण राजकीय सहभागाचा औपचारिक आणि अनौपचारिक पध्दतीने विस्तार करू शकतो.

अनेक अभ्यासकांनी दर्शविल्याप्रमाणे राजकीय सहभाग हा स्त्री आणि पुरुषांच्या लैंगीकतेवर आधारीत आहे. पुरुषांशी तुलना करता स्त्रियांचे औपचारिक सहभाग कमी आहेत. अनौपचारिक सहभागामध्ये, आज स्त्रियांच्या प्रमाणात विशेषकरुन भारतीय स्त्रियांच्या प्रमाणात सुधारणा होत आहे. यामुळे आपणास स्त्रियांच्या औपचारिक सहभागामध्ये अग्रेसरपणा आणि औपचारिक सहभागामध्ये माघार या विषयी विश्लेषण करणे गरजेचे आहे.

स्त्रियांविषयीचे संशोधक बोलस्, ऐलिस्टेन, जॅकवेट, जिबेल यांच्या मतानुसार स्त्रियांचा कुटुंबातील व्यक्तिगतपणा किंवा पुढाकार नसल्यामुळे औपचारिक राजकीय सहभागामध्ये स्त्रिया मागे आहेत. समाजकारणाशी कमी संबंध, खाजगी जीवनातील पूनूर्निर्मीती आणि घरकाम यामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग कमी आहे.

औपचारिक राजकीय सहभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण, मतदान, राजकीय कार्यालये ही पुरुष व स्त्रिया या विस्तृत घटकाशी संबंधित आहेत. पण वरील घटकांऐवजी राजकारणातील परिणामकारकता घटक हा मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय घटकांनी दर्शविला जातो. जेव्हापासून मानव या परिस्थितीचा उद्गाता आहे तेव्हापासून व्यक्ती सामाजिक वातावरणामध्ये उच्चभ्रू आणि सुधारीत बनत गेली व त्यातून तीची मुल्ये आणि दृष्टिकोन सुधारत गेले.[१] जरी अलिकडील काळात परिस्थितीमध्ये चांगल्या प्रकारे बदल घडत असला तरी आपल्या समाजामध्ये जी परिस्थिती अनेक वर्षांपासून उद्रेक पावली आहे तिचे विश्लेषण करणे अधिक गरजेचे आहे.

आर्थिक सुधारणांचा आधार घेवून भारतीय समाजातील स्त्रियांच्या

दर्जाचा अभ्यास काही इतिहासकारांनी केला आहे. वैदिक काळापासून शिक्षणातील वाढ, धार्मिक हक्क, स्वातंत्र्य चळवळ यामधील स्त्रियांचा वाढता सहभाग दिसून येतो. [२] मोतिलाल बनारसीदास यांच्या मतानुसार "वर्गीकृत समाजाची क्रांती की जी नंतरच्या काळात वर्ण व शूद्र जाती व्यवस्थेमध्ये बदलली तो कालावधी म्हणजे मनुस्मृतीचा आणि स्त्रियांच्या हिनतेच्या सुरुवातीचा कालावधी आहे. वैदिक काळातील गार्गी, मैत्रेय, अत्रेय, आम्रपाली, मिरा, राणीकित्तूर चन्नम्मा यासारख्या हुषार व प्रतिभाशाली स्त्रियांखेरीज सर्व स्त्रियांचे जीवन आणि त्यांचे दुय्यम स्थान "मनूकोड" मध्ये दाखवले आहे. मुलगी म्हणून तिच्या बापाच्या, पत्नि म्हणून पतिच्या आणि विधवा म्हणून आपल्या मुलग्याच्या ती देखरेखी असावी अशी मनूस्मृती म्हणते. वैदिक काळापासून सर्व सामाजिक आणि सांस्कृतिक दुय्यम स्थानाचे विश्लेषण केल्याने ते समजण्यास पुरेसे आहे. तरी-सुध्दा वैदिक संस्कृतीनंतर "स्त्रीधन" म्हणून जो संपत्तीचा हक्क प्राप्त झालेला आहे. तो हक्क म्हणजे पारंपरिक स्वातंत्र्य होय. असे कोणी-तरी दर्शवतो. परंतु स्वातंत्र्याच्या अर्थाचा स्विकार आणि त्याग हा मुद्दा अजून वादग्रस्त आहे. तेंव्हापासून बौध्द भिक्षुनींनी जो स्वीकार केला आहे त्याने एक नविनच क्षेत्र स्त्रियांसाठी निर्माण केले आहे. उमाचक्रवर्ती यांनी दर्शविल्याप्रमाणे संघामध्ये सुध्दा अनुभवी स्त्रीचा तारतम्यभाव सोडून वागतात. आणि त्यामध्येही स्त्रियांना दुय्यम स्थान दिसून येते. तरी सुध्दा आणखी एक पारंपरिक धार्मिक स्वातंत्र्य स्त्रियांना दिले आहे. ते म्हणजे भक्ति चळवळीचे स्वातंत्र्य होय. या चळवळीमुळे स्त्रियांमध्ये अक्कमहा-देवी, बहिणाबाई, लल्ला आणि मिराबाई यासारख्या संत स्त्रिया निर्माण झाल्या. जेंव्हापासून ही चळवळ धार्मिक क्षेत्रापुरती व व्यक्तिगत मोक्षा-पुरती मर्यादित होती तोपर्यंत स्त्रियांचे सामाजिक प्रश्न सुटले नाहीत. परिणामता त्यामुळे स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे राहिले. या काळात धार्मिक कर्मकांडामुळे स्त्रियांचा दर्जात फारशी सुधारणा झाली नाही. [३]

मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातील १९व्या शतकातील समाज सुधारणेची चळवळ आणि २०व्या शतकातील राष्ट्रीय चळवळ यामुळे स्त्रियांच्यामध्ये सुधारणात्मक परिणाम झालेला आपणास दिसून येतो.

१९व्या शतकातील समाज सुधारणेची चळवळ ही स्त्रीचे दुय्यम स्थान लक्षात आणून देणारी असून ती स्त्रियांचा दर्जा कमी असण्यासंबंधी बाल-विवाह, विधवेचा छळ, पुनर्विवाह , बहुपत्नित्व, सती, स्त्रियांचे मालमत्ते-विषयीचे अधिकार आणि शिक्षण याविषयीची नकारात्मक भूमिका यावर लक्ष केंद्रित करते असे असूनही ही प्रक्रिया पारंपरिक समाजकुटुंबातील स्त्रियांची स्थिती व त्यांच्या सुधारणेविषयी मर्यादित होती. जेव्हा स्त्रियांना त्यांचे अधिकार, त्यांची मालमत्ता, बालविवाहास अमान्यता आणि शिक्षणाचा अधिकार दिल्यानंतर, स्त्रियांचा दर्जा वाढल्याचे दिसून आले. [४]

या विरुद्ध, दुसरी चळवळ की जी, ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, ईश्वरी साक्षात्कार घडवून आणणारी संस्था यासारख्या देशातील समाजरचनेवर आघात करते. असे असले तरी त्या प्राथमिक धार्मिक बाबी होत्या. धर्म हे सामाजिक जीवनाचे उगमस्थान होते. धार्मिक सुसंगती हे तत्व सामाजिक बदलांचे चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करते. [५] राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, एम्.जी. रानडे, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले यासारख्या समाज सुधारकांनी अशा अन्यायाविरुद्ध आणि दुष्प्रवृत्तींविरुद्ध आवाज उठवला. तसेच दयानंद सरस्वती, ॲनी बेझंट आणि स्वामी विवेकानंद यासारख्या समाज सुधारकांनी प्राचीन वेदिक संस्थेला पुनरुज्जीवीत करण्यासाठी प्रयत्न केला. कारण ही संस्था स्त्रियांसाठी काम करणारी आहे. याच काळात १८८७ मध्ये "राष्ट्रीय सामाजिक परिषद" ही संघटना मान्य केलेल्या सामाजिक, धार्मिक सुधारकांनी वाढवली. म्हणूनच

१९व्या शतकात सामाजिक-धार्मिक गट सर्व देशभर आढळतात. निसर्गताच नेतृत्व हे मोठ्या प्रमाणावर पुरुषांकडून आले म्हणून स्त्रिया या सामाजिक, धार्मिक बंधनात बांधल्या गेल्या. तरीसुध्दा समाजसुधारकांच्या चळवळीमुळे असे दिसून आले आहे की, स्त्रियांमधील जागरूकता वाढीस लागली आहे. त्याच बरोबर काही स्त्रियांनी स्वत:ला पुरुषांबरोबर संपूर्ण समानतेचे हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ कमलादेवी चटोपाध्याय या काळात ॲनि बेझंट यांनी स्त्रियांची सामाजिक स्थिती बद्दल अनेक वेळा स्पष्ट केली होती. "मानवाचे अधिकार" ही आज स्वीकारलेली एक तत्वप्रणाली आहे. परंतु दुर्दैवाने ती पुरुषसत्तेशीच संबंधित असून ती व्यापक अधिकाराविषयी नाही. यावरून स्त्रियांचे अधिकार अमान्य करणे म्हणजे मानवतेला नाकारणे होय. यातूनच पुरुषांच्या अधिकाराला तर्कशास्त्रीय पाया नाही असे दिसून येते. म्हणूनच सर्वांना समान अधिकार मिळाले पाहिजेत. [६]

समाजात स्त्रिया जरी शिक्षित असल्या आणि त्यांची सामाजिक व राजकीय घटकात हक्कांची मागणी वाढत असली तरी, त्यांची पुरुषांबरोबर स्पर्धात्मक भागीदारी होऊ शकत नाही. सुशिक्षित स्त्रिया, माता, शिक्षिका, परिचारिका, नगरसेविका या आपली कामे योग्य प्रकारे पार पाडत असतात. "स्त्री" हक्कामध्ये वाढ झाली पाहिजे असे त्यांना वाटत असले तरी त्यादृष्टीने त्या संघटनात्मकरित्या एकत्र येऊ शकत नाहीत. परंतु "भारतीय राष्ट्रीय चळवळी"मुळे स्त्री संघटनेला पाठबळ मिळाले होते. २०व्या शतकात १९१७ मध्ये पुरुषाबरोबर स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे अशी मागणी भारताच्या पहिल्या महिला प्रतिनिधी सरोजिनी नायडू यांनी केली होती. १९१९ च्या नविन सुधारित कायद्याद्वारे हा मुद्दा त्या, त्या प्रांतातील सभागृहात मांडण्यात आला. पुढे १९२१ मध्ये समाज सुधारणेचा कायदा झाला. त्यामध्ये फक्त थोडया स्त्रियांसाठीच प्रतिनिधीत्व, मालमत्ता

आणि शिक्षण यासारख्या कांही बाबी राखून ठेवण्यात आल्या. यापूढील काळात सन १९२९ मध्ये कायदेमंडळाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार दिला, यावेळीच मद्रास प्रांतात कायदेमंडळाची सदस्या डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी यांना मार्गदर्शक म्हणून नेमणूक करावी अशी मागणी भारतीय स्त्री संघटनेतर्फे करण्यात आली होती. मात्र त्यावर फारसा विचार झाला नाही.

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्यावेळी सरोजिनी नायडू यांनी स्त्रियांच्या राखीव जागासंबंधीचे निवेदनपत्र सादर केले. या काळात बेगम हमिदाअली, राजकुमारी अमृत कौर आणि डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी यांची ब्रिटीश पार्लमेंट कमिटीत नेमणूक करण्यात आली. यामध्ये असे स्पष्ट अनुमान काढण्यात आले की, उच्च जाती व वर्गाकडून स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झालेल्या स्त्रिया-पुरुषांसारख्या नेतृत्वाचा उत्तम असा नमुना दाखवून देतात. म्हणून स्त्रियांना कायम स्वरुपी स्वातंत्र्य दिले पाहिजे यासाठी स्त्री चळवळींनी जोर धरला. गांधीजींच्या काळात राष्ट्रीय चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग होता. परंतु सहभागी असणाऱ्या स्त्रिया या उच्च आणि मध्यमवर्गीय होत्या. गांधीजींनी निरिक्षण केलेल्या स्त्रियांच्या अधिकारांविषयीची ओळख त्यांच्या "यंग इंडिया" मधील लिखानात दिसून येते. त्याच्यावरुन स्त्री ही पुरुषाच्या तुलनेत समान बौध्दिक क्षमता असणारी आहे असे स्पष्ट होते.[७] त्यावेळी वेगवेगळ्या स्त्री संस्थानी गांधीजींच्या हाकेला साथ देवून चळवळीत सहभाग घेतला. १९३० मधील नागरिकत्व अधिकार चळवळीत त्यांनी ब्रिटीश सरकार विरुध्द लढा देण्याची नविन पध्दत वापरली. ती म्हणजे परकीय मालावर बहिष्कार घालणे, सरकारच्याधोरणासंबंधी असूसंगत वागणे. यासारख्या पध्दती वापरल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली नागरिकत्व चळवळ आणि मिठाचा सत्याग्रहाच्यावेळी स्त्रियांनी सहभाग घेतला होता. हा सहभाग अद्वितीय मानला गेला होता. मानवाच्या इतिहासातील ही एक उत्क्रांती आहे.[८]

गांधीजींच्या चळवळीत सामील होण्याच्या हाकेने केवळ सुसंस्कृत स्त्रियाच सहभागी झाल्या नाहीत तर इतर समाजातील स्त्रियादेखील यात सामील झाल्या. त्यामुळे सामाजिक व धार्मिक समाजसुधारकांनी स्त्रीचा स्वत:बद्दलचा दृष्टिकोन बदलण्यासाठी खास प्रयत्न केले.

१९३१ मध्ये नलिनाकाक्षी सन्याल, कमला चटोपाध्याय पासून नेहरू पर्यंतच्या सर्व प्रकारच्या कामात समाविष्ट झाल्या. त्यांनी चळवळीची सर्व कामे स्वीकारून कॉंग्रेसच्या सर्व बैठकींना उपस्थिती दाखविली. त्यामुळे त्यांना १९४९ पासून भारतीय कायदेमंडळात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. कांही महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी १९४७ च्या "सर्व भारतीय महिलांच्या सभेमध्ये" भारतीय महिलांचे हक्क व कर्तव्ये जाहीर केली. या महिलांच्या राष्ट्रीय सभेचे इंग्लंडपासून अमेरिकेपर्यंत आंतरराष्ट्रीय संबंध होते. त्यांनी स्त्रियांच्या चळवळीमधील मानवी मुल्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्नपूर्वक जाहिर केली. [९]

१९३५ च्या कायद्याने भारताशी संबंधित असलेल्या सर्व महिलांना मतदानाचा अधिकार दिला. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेत स्त्रियांविषयी कांही वचने दिली गेली. ही वचने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी (हिंदू कोड बील) आणि कॉंग्रेसचे जवाहरलाल नेहरू यांनी तयार केलेली होती. डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून, स्त्रियांना राज्यघटनेचे दरवाजे उघडण्यासाठी आर्ट १४, आर्ट १५, आर्ट १६, आर्ट ३२५ इत्यादी कायदे होते. परंतु हे कायदे कागदावरच राहिले. मात्र या कायद्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीचे सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार महिलांनाही होते. मात्र वेगवेगळ्या राजकीय निवडणूकांमध्ये प्रत्येक पक्षातील स्त्रियांचे प्रमाण हे वेगवेगळे आहे.

यापैकी काँग्रेस पक्षात त्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर इतर पक्षामध्ये त्यांचे प्रमाण अगदीच कमी म्हणजे ३ टक्के ते ७ टक्के पर्यंत आहे. त्यापैकी अत्यंत कमी संख्येने महिला "मंत्री" म्हणून काम पहात असतात. परंतु वेग-वेगळ्या राजकीय पक्षांच्या नोंदीनुसार महिलांचे राजकीय सहभागाचे प्रमाण हे १० टक्के ते १४ टक्के पेक्षा जास्त नाही. पण ज्या महिला राजकारणात पूर्णपणे सक्रिय आहेत, त्यापैकी फारच थोड्यांना त्या, त्या पक्षाद्वारे निवड-णूक लढवण्यासाठी तिकीट दिले जाते. त्यातील कांही उदा. प्रेमिलाताई चव्हाण, प्रभाराव, मोहसिना किडवाई, राजमाता विजयाराजे शिंदे अशा स्त्रीया मोठया पदापर्यंत पोहोचतात.

भारतात मतदान करण्याच्या पध्दतीमध्ये मिळालेल्या माहितीनुसार महिला मतदारांचे प्रमाण ३८.७७ टक्के ते ५६ टक्के पर्यंत वाटलेले आहे. परंतु यापैकी जवळजवळ ४४ टक्के महिला मतदार राजकारणापासून अलिप्त असतात. मतदान करण्यापलिकडे त्यांचा राजकारणाशी कोणताही संबंध नसतो. राजस्थान, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि आसाम या राज्यांत स्त्रियांच्या मतदानाचे प्रमाण कमी आहे. या उलट महाराष्ट्र, तामीळनाडू, केरळ, हरियाणा, पश्चिम बंगाल या राज्यांत त्यांचे मतदानाचे प्रमाण अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, ज्या भागातील स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्र कमी आहे तेथे मतदानाचे प्रमाण अधिक आहे. वाढत्या शहरीकरणामुळे अतिशय सशक्त असा राजकीय पाया तयार झाला आहे. या उलट राजकारणात कमी भाग घेणा-या भागात शिक्ष-णाची अभावता त्याच बरोबर जात-वर्ग ही प्रमुख कारणे आहेत.

राजकारणावर वेगवेगळे घटक प्रभाव पाडत असतात. या घटकांमुळे राजकीय वर्तनुकीत बदल होत असतो. राजकारणात व्यक्तिगतदृष्टया कांही

अभ्यासावरून असे दिसून येते की, शहरी स्त्रियांच्या राजकारणामध्ये ग्रामीण स्त्रियांच्या राजकारणापेक्षा विविधता आढळते. राजकारणात शिक्षण हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे की ज्यामुळे उमेदवाराला अधिक प्रमाणात जाण येते. म्हणून आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, राजकीय आणि सामाजिक गोष्टींची जाणीव होण्यासाठी त्यांचे शिक्षणाशी कायमचे नाते असणे आवश्यक आहे. परंतु पुष्कळ सुशिक्षित महिला राजकारणात व समाजकार्यात सहभागी होत नाहीत. या उलट कमी शिकलेल्या किंवा अडाणी स्त्रिया या राजकारणातील विविध जाणिवा आणि माहिती घेण्यासाठी कार्यक्षमतेने आणि परिणामकारकरित्या भाग घेण्यासाठी उत्सुक असतात.

यावरून असे अनुमान काढले जाते की, परिणामकारक राजकीय कार्यासाठी राजकीय कार्यक्षमताही अत्यंत महत्त्वाची आहे. जरी राजकीय सामाजिक परिस्थिती असली तरी त्यातील प्रेरणेने महिला उमेदवारांची संख्या वाढलेली नाही. यामुळेच राजकारणातील स्त्रियांच्या प्रवेशासाठी ३० टक्के राखीव जागा ठेवून त्यांची संख्या वाढवण्याचे साधन उपलब्ध होत आहे.

यावरून असे अनुमान काढता येते की, राजकारणातील क्षेत्रामध्ये स्त्रियांना ठराविक प्रकारचा दर्जा असावा. त्यासाठी जरी सामाजिक आणि तात्विक यासारखे घटक त्याला पुरक असले तरी आज सरकारणे सुरु केलेल्या महिलांविषयक वेगवेगळ्या योजनेद्वारे त्याचा दर्जा वाढत आहे. यानुसार त्यांच्यातील पारतंत्र्य कसे कमी होत गेले आहे, आणि आता त्यांना मुख्य प्रवाहात पुरुषांच्या बरोबरीने स्थान देण्यात आल्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत व अधिकारात कशाप्रकारे सुधारणा होत गेल्या ? तसेच त्या राजकीय कारभार कशा पध्दतीने करतात हे आपण मुरगूड नगरपालिकेचा विशेष अभ्यास करून पाहू.

.....

## प्रकरण पहिले

## संदर्भसूची


१) स्नेहलता पांडा - राजकीय सहभागाचे घटक (हिंदी), अजंठा प्रकाशन, दिल्ली, १९९०, पृ.क्र. ६.

२) स्नेहलता पांडा - राजकीय सहभागाचे घटक (हिंदी), अजंठा प्रकाशन, दिल्ली, १९९०, पृ.क्र. २५.

३) उमा चक्रवर्ती - "द राईज ऑफ बुद्धीझम" एज इंफ्लुएन्ट बाय वुमन, १९८०, अप्रकाशित.

४) कमलादेवी चटोपाध्याय - "इंडियन वुमन बॅटल फॉर फ्रिडम", अभिनव प्रकाशन, १९८३, पृ.क्र. ६७.

५) कमलादेवी चटोपाध्याय - "इंडियन वुमन बॅटल फॉर फ्रिडम", अभिनव प्रकाशन, १९८३, पृ.क्र. ५०.

६) "स्थानिक स्वराज्य", अर्धवार्षिक, नोव्हेंबर, १९९२ ते एप्रिल, १९९३.

७) "यंग इंडिया", एम्.के. गांधी, नवजीवन प्रकाशन, १९६९.

८) "सर्वोदय", एम्.के. गांधी, नवजीवन प्रकाशन

९) कमला भासीन सेठ, "दि पोझिशन ऑफ वुमन इन इंडिया", मुंबई, १९७१.


......